# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/10/2023 (गुरूवार) दुपार

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. वेलतूर :— अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा राजोला येथे दिनांक २५/१०/२०२३ चे १४.०० वा. ते १५.०० वा. दरम्यान वेलतूर पोलीस पथक यांना गोपनीय माहीती मिळाली की, मौजा राजोला येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरून वेलतूर पोलीस पथकाने पेट्रोलिंग दरम्यान नमुद घटनास्थळी जावुन यातील ट्रॅक्टर इंजीन क्र. MH 40/BE-7034 चालक **आरोपी नामे—१) प्रकाश विठठल राघोर्ते, वय ३८ वर्षे रा. राजोला** हा **मालक नामे—२) पुरूषोत्तम सीताराम वाडीभस्मे, वय ४४ वर्ष** याचे सांगणेवरून हे मौजा राजोला गावातुन जाणाऱ्या कन्हान नदीच्या पात्रातुन JHON DEERE कंपनीचा ट्रॅक्टर इंजीन क्र. MH 40/BE-7034 किंमती ३,००,०००/—रू व ट्रॉली मध्ये १ ब्रास रेती किंमती अंदाजे ५,०००/—रू विनापरवाना भरून अवैद्यरीत्या चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून असा एकुण वाहनासह ३,०५,०००/—रूपयाचा मुद्देमाल वाहनासह जप्त केला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस उपनिरीक्षक विलास कंरगामी पोलीस स्टेशन वेलतुर यांच्या रिपोर्टवरून पोस्टे. वेलतूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भादवी सहकलम ५०/१७७ मोवाका. सहकलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विलास कंरगामी पोलीस स्टेशन वेलतुर मो. नं. ९७६६३७६४८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर